Impact Factor 7.149

67

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-VIII | ISSUE-VIII | Aug. | 2021

Address
Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
(+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
aiirjpramod@gmail.com
aayushijournal@gmail.com

Website
www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr.Sarala R.Menon | Standardization and Globalization of Communicative Competency of ESL | 1 To 4 |
| 2 | Uttam B. Chougale, Pravin R. Kharade, Hemant V. Chavan, Rajan S. Kamble & Savita R. Dhongade | Synthesis of 1,3-Diaryl Substituted Pyrazole Based Curcuminoids as Potent Antibacterial Agents | 5 To 10 |
| 3 | Ms. Nishi Kumar | The Relationship Between Online Teaching- Learning on The Mental Health of Bachelor of Education Students | 11 To 18 |
| 4 | Dr. Chandrakant S. Duble | Utility of Plyometric Training Method for Improving Explosive Power of Leg and Speed of Hockey Players | 19 To 21 |
| 5 | Mrunal S.Barki | Information Seeking Behaviour Models : An Overview | 22 To 26 |
| 6 | Dr Umesh Rathi | Effect of Aerobic Exercise on The Basket Ball Skills of Basket Ball Players | 27 To 28 |
| 7 | Shital Shivaji Giri | The role of Agriculture in Indian Economy | 29 To 30 |
| 8 | Vd. Rahul Mohan Khurangale | A Comparative Clinical Study of Edagajadi Lepa and Bhallatakadi Lepa in the Management of Dadru W.S.R to Tinea Infection | 31 To 34 |
| 9 | Dr. Chandrakant S. Duble | Utility of Plyometric Training Method for Improving Explosive Power of Leg and Speed of Hockey Players | 35 To 37 |
| 10 | Sudharkar Balu Chavan | Women Entrepreneurship Development in 21st Century in India | 38 To 40 |
| 11 | Dr. Pachling Somnath Kishanrao | The Role of Newspapers in Student's Life - Special Reference to Nanded City | 41 To 43 |
| 12 | Dr.Rajani Arunsaheb Deshmukh | A Study of Retail Market and Analysis of Consumers Buying Behaviour in Malls:With Reference to Aurangabad City | 44 To 47 |
| 13 | Pandit T. Kadam & Dr. Balaji G. Girgaonkar | Scheduled Tribe Pardhi Children and Their Educational Accessibility With Special Reference to Socio-Economic Status in Ahmednagar District | 48 To 51 |
| 14 | Dr. K. M. Desai | A Sociological Study of Marginal Farmers in Kolhapur District | 52 To 54 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 15 | Anil Kanhuji Dipke | The Phenomenal Women Empowerment in India and Perspective | 55 To 57 |
| 16 | Sampada Kale | A Study on Students Satisfaction of Online Learning During Covid-19, With Reference to Commerce Students of Latur City | 58 To 61 |
| 17 | Dr. Chandrakant S. Duble | Eye-Hand Coordination Ability and Reaction Time of Table Tennis and Badminton Players of RTM Nagpur University | 62 To 64 |
| 18 | Dr.Lalchand K.Ramteke | The Crime, Urbanization in India and it's Consequences | 65 To 68 |
| 19 | Dr. K. M. Desai | A Sociological Study of Female Sex Workers in Kolhapur Town in Maharashtra | 69 To 71 |
| 20 | Mangala Patil | Impact of Covid-19 Pandemic on Indians: Interventions and Solutions | 72 To 79 |
| 21 | Dr.Ketaki Pandurangrao Gavle | Review of Terminalia Arjuna an Ancient Drug as an Alternative Remedy for Cardiovascular Diseases | 80 To 86 |
| 22 | Dr. Chandrakant S. Duble | Emotional Competence of Women Football Players Participating in State Level Tournaments | 87 To 90 |
| 23 | Dr. P.B. Kavyakishore & Jagadeesha M. | Online Teaching & Its Outcomes | 91 To 94 |
| 24 | Dr. Trishala V. Kadam | Sustainable Development in Textile and Clothing Industry | 95 To 100 |
| 25 | Dr. Jaya Pundlikrao Ramteke & Dr. Uday Neralkar | Role of Avipattikar churna in the management of Amlapitta:A Review Article | 101 To 102 |
| 26 | शिल्पा रानी<br>डॉ. ज्योति कपूर भार्गव | बैंकिंग में कार्य सन्तुष्टिकरण: निजी और सार्वजनिक क्षेत्र के बैंकों का एक अध्ययन | 103 To 107 |
| 27 | कीर्ति शर्मा | संवेदना की भाव भूमि पर डॉ. अखिलेश पालरिया की कहानियां | 108 To 110 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 28 | डॉ. शकुंतला देवी राणा | मीडिया और बाजारवाद | 111 To 114 |
| 29 | मिस. रमनदीप कौर<br>डॉ.गुरमीत सिंह | महिलाओं का सामाजिक एवं आर्थिक क्रियाकलापों के प्रतिमानो के प्रति अवधारणा का विश्लेषणात्मक अध्ययन | 115 To 120 |
| 30 | डॉ.व्ही.सी.ठाकुर | विमर्श की नई धारणा– स्त्री विमर्श | 121 To 122 |
| 31 | डॉ. शकुंतला देवी राणा | नाथ पंथ और बालकनाथ का ऐतिहासिक–सामाजिक अवदान | 123 To 125 |
| 32 | डॉ. मोहनन वी टी वी | एण्डन पोपॉविक तथा अनुवाद के क्षेत्र में उनका योगदान | 126 To 127 |
| 33 | डॉ. प्रकाश कांबळे | महात्मा फुले : बहुजन के शिक्षा साहयकर्ता | 128 To 131 |
| 34 | प्रा.डॉ. शोभना वि. जोशी<br>प्रविण म. पाथरकर | निवड आधारित श्रेयांक पद्धतीची अंमलबजावणी करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना | 132 To 136 |
| 35 | डॉ. युवराज पंढरीनाथ जाधव | भारतातील विदेशी गुंतवणुकीवर कोव्हिड–१९ चा झालेला परिणाम | 137 To 142 |
| 36 | प्रा. पदमाकर बळीराम तटाळे | महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- विशेष संदर्भ कोल्हापूर महानगरपालिका | 143 To 147 |
| 37 | प्रा. डॉ. गणेश लहाने | संत चोखामेळा यांच्या अभंगातील भावसौंदर्य | 148 To 150 |
| 38 | शंकर बालासाहेब गिरी | पंचायत राज आणि महिला आरक्षण धोरण | 151 To 153 |
| 39 | प्रा. तानाजी संभाजी माने | संसदीय लोकशाही आणि महिलांचा राजकारणातील सहभाग | 154 To 160 |
| 40 | प्रा.डॉ. शोभना वि. जोशी<br>प्रविण म. पाथरकर | निवड-आधारित श्रेयांक प्रणाली: गुण आणि मर्यादा | 161 To 165 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 41 | **एस.के खरात** | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ | 166 To 170 |
| 42 | प्रा.डॉ.राजेंद्र दिलीप आगवाने | भारताच्या संसदिय राजकारणात विरोधी पक्षांची भुमीका आणि वाटचाल | 171 To 176 |
| 43 | **डॉ. भरत भिमराव जाधव** | तौलनिक साहित्याभ्यासातील संस्कृती अभ्यासाचे महत्त्व | 177 To 184 |
| 44 | डॉ. मिस. सुवर्णा प्रकाश पाटील | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे साहित्य आणि स्त्रीवादी चळवळ | 185 To 188 |
| 45 | डॉ. आर बी लक्षेटे | भारतातील स्त्री चळवळी दशा व दिशा | 189 To 193 |
| 46 | अविनाश गंगाधर मुसळे | 2014 विधानसभेची निवडणूक आणि कारणमीमांसा | 194 To 198 |
| 47 | अविनाश गंगाधर मुसळे | महाराष्ट्राच्या राजकारणावर जातीचा प्रभाव एक अभ्यास | 199 To 203 |

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- VIII | ISSUE- III | MARCH | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# मुस्लिम कविता आणि सांस्कृतिक संघर्ष

**प्रा.डॉ. गणेश लहाने**

दयानंद वाणिज्य महाविद्याय, लातूर

**प्रस्तावना :-**

मुस्लिम साहित्य आणि मुस्लिम कवितेची परंपरा ही भारतात चारशे - पाचशे वर्ष जुनी असलेली दिसून येते. मुस्लिम समाजातील अनेक संतांनी आपली साहित्यनिर्मिती मराठी भाषेत केली. त्यांचा जन्म मुस्लिम धर्मात झाला असला तरी वारकरी संप्रदाय आणि संताच्या सहवासामुळे, त्यांची अभंगनिर्मिती पाहून त्यांनी मराठी भाषेत काव्यनिर्मिती करायला सुरुवात केली. त्यानंतर कमी अधिक प्रमाणात ही काव्यनिर्मिती सुरुच होती. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारत व पाकिस्तान या दोन देशांची निर्मिती झाली. त्यामुळे मुस्लिम धर्म आणि साहित्यिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. साठोत्तरी कालखंडात अनेक नवीन साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्याचेच प्रत्यंतर मुस्लिम मराठी साहित्याच्या रुपाने आढळते. १९८० नंतर मराठी साहित्यविश्वात मुस्लिम कवितांचे लेखन मोठ्या प्रमाणात झालेले दिसून येते. त्यात प्रा.फ. म. शहाजिंदे, इब्राहीम खान, कवी खांवर, मुबारक शेख, इलाही जमादार, खलील मोमीन, अजीज नदाफ, सय्यद अल्लाउद्दीन, एहतेशाम देशमुख असे कितीतरी मुस्लिम कवी आधुनिक काळात काव्य लेखन करत आहेत.

इ.स. १९७५ नंतर हिंदुत्ववादी संघटनांची निर्मिती झाली त्याचा परिणाम मुस्लिम धर्म आणि साहित्यिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला असे मुस्लिम साहित्यिकांना वाटू लागले. अनेक वेळा हिंदू आणि मुसलमान यांच्यात संघर्ष झाले त्याचे प्रत्यंतर मुस्लिम कवितेत उमटले आहे. आधुनिक काळातील मुस्लिम मराठी काव्याचे वर्गीकरण तीन प्रकारात करता येईल त्यात गझल, मुक्त छंद आणि अनुकरणात्मक काव्य या तीन काव्य प्रकारातून लिहिलेल्या काव्याचे स्वरुप हे प्रेमकाव्य, निसर्गकविता, सौंदर्य कविता, सामाजिक कविता, भ्रष्टाचार, बेकारीचे प्रश्न आणि सांस्कृतिक जीवन असे होते.

मुस्लिम मराठी कवितेविषयी माहिती पाहत असताना 'मराठी मुसलमान आणि मराठी माणूस' म्हणून जगत असताना त्यांच्या आयुष्यात जे ताण - तणाव निर्माण झाले त्याचे चित्रण त्यांनी आपल्या कवितेत केले आहे. एकंदरीत मुस्लिम कवितेविषयी आपले मत व्यक्त करताना प्रा. नरहर कुरुंदकर असे म्हणतात की, 'मुसलमान कवी मुस्लिम समाजात जन्माला आले. इतक्या अर्थानेच 'मुसलमान' आहेत. त्यांची भाषा, त्यांचे विचार आणि साहित्यातून व्यक्त होणारी त्यांची संस्कृती या सा-यांच्यासह हे सारे लिखाण अगदी हिंदू आहे''[१] नरहर कुरुंदकर यांच्या मताचा विचार करता मराठी मुस्लिम कवी हे भाषा, विचार या दृष्टिने ख-याअर्थाने मराठीच असलेले दिसून येते असे असले तरी मराठी कवितेतून मुस्लिम कवींनी जे सांस्कृतिक विचार मांडले त्यातील कांही कवी आणि त्यांच्या कवितेतील सांस्कृतिक विचार याची माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल.

**फ. म. शहाजिंदे यांच्या कवितेतील सांस्कृतिक विचार :-**

प्रा. फ. म. शहाजिंदे हे १९८० नंतर काव्यलेखन करणारे एक महत्त्वाचे कवी म्हणून ओळखले जातात ते जरी मुस्लिम असले तरी त्यांना हिंदू व मुस्लिम हे दोन्ही धर्म त्यांना आपले मानत नाहीत. मुस्लिम धर्मीय त्यांना कान्होपात्रेच्या कुळातील म्हणून हीन समजतात तर हिंदू त्यांना मुस्लिम समजतात अशी कोंडी फ. म. शहाजिंदे यांची झालेली दिसून येते 'निधर्मी' या फ. म. शहाजिंदे यांच्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लेखन करताना प्रा. नरहर कुरुंदकर म्हणतात, ''शहाजिंदे हे फक्त जन्माने मुस्लिम आहेत त्यांची कविता मराठी वळणाची आहे.'' तर स्वतः शहाजिंदे म्हणतात, 'मुसलमान कितीही सद्गुणी असला तरी हिंदूचा त्यावर विश्वास नाही'.[२]

फ.म. शहाजिंदे यांनी 'निधर्मी', 'ग्वाही' आणि 'आदिम' असे तीन काव्यसंग्रह लिहिले. 'निधर्मी' हा काव्यसंग्रह म्हणजे धर्म नाकारणारा पण प्रत्यक्षात समाजात तसे झाले नाही. म्हणून त्यांनी 'नोंदीतून गळणारं आत्मचरित्र' या कवितेत म्हणतात,

"माझी उणी काढून।
तुमच्या अस्तित्त्वाची कल्हई होत असेल
तर काहीच हरकत नाही."[३]

या कवितेतून ते वाचकांना सुन्न करण्याचा प्रयत्न करतात. धर्म, जात नाकारण्याचा त्यांच्या कवितेत प्रयत्न केला आहे. पण समाजव्यवस्थेत मात्र याच्या उलट चित्रण दिसते. हे सांगताना स्वतः फ.म. शहाजिंदे म्हणतात, "हिंदूनी मुसलमान म्हणून दूर ठेवल्याने आणि मुसलमानांनी कनिष्ठ कुळातील म्हणून दूर ठेवल्याने, निर्माण झालेला तुटलेपणा किंवा एकलेपणा हिंदूच्या इतिहासात तळागाळातल्या ग्रामीण मुसलमानांना काय स्थान आहे आणि मुसलमान कितीही सद्गुणी असला तरी हिंदूचा त्यावर विश्वास नाही."[४] अशी खंत व्यक्त केली आहे.

'निधर्मी' काव्यसंग्रहात फ. म. शहाजिंदे यांच्या अभिव्यक्तीची सुरुवात, मुसलमान प्राध्यापक, परका, नाकारला गेलेला असा सांस्कृतिक संघर्ष आलेला आहे. 'आदम' काव्यसंग्रहातील कवितेमधून केवळ त्यांनी 'माणूस' हाच केंद्रबिंदू समजूण काव्यलेखन केले आहे तर 'ग्वाही' या कवितासंग्रहात भारतातला ज़ातीयवाद, जमातवाद, सामाजिक आणि राजकीय भ्रष्टाचार हा भाव व्यक्त केला आहे. मुस्लिम साहित्याच्या बाबतीत विचार व्यक्त करताना स्वतः फ.म. शहाजिंदे असे म्हणतात की, "मुस्लिम मराठी साहित्यात दलित साहित्यात ज्या प्रमाणे 'दलितपण' प्रकर्षाने जाणवते त्याप्रमाणे मुस्लिम मराठी लेखकात 'मुसलमानी' जाणवत नाही."[५]

एकंदरीत फ.म. शहाजिंदे यांच्या कवितेत माणसाला तुच्छ समजणा-या समजाविरुद्ध, परंपराविरुद्ध त्यांनी आवाज उठविला आहे.

**सय्यद अल्लाउद्दीन यांच्या कवितेतील सांस्कृतिक संघर्ष :-**

सय्यद अल्लाउद्दीन यांचा जन्म बीड जिल्ह्यात झालेला असून त्यांच्या कवितेतून सामाजिक बांधिलकी आलेली दिसून येते. त्यांच्या कवितेवर फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. 'निकाह' नावाच्या कवितेत त्यांनी अल्पवयीन मुस्लिम मुलीचे वयस्कर अरब माणसाशी लग्न लावल्याची सामाजिक समस्या मांडली आहे. तर 'दंगल काही हुंदके' या कवितेत आयोध्या दंगलीचे वर्णन केले आहे. ते म्हणतात,

'आम्ही अर्धे गांधी। अर्धे नथुराम ।'[६] या कवितेत भारतात मंदिर - मशीद प्रश्नावरुन सांस्कृतिक संघर्ष कसा विकोपाला जातो याचे वर्णन केले आहे.

एकंदरीत सय्यद अल्लाउद्दीन यांच्या कवितेतून जातीयता, धार्मिक दंगली, सावकारशाही यांच्या विरुद्ध आवाज उठविलेला आहे.

**इब्राहीम खान यांच्या कवितेतील सांस्कृतिक संघर्ष :-**

इब्राहीम खान यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात झाला असून त्यांच्या कवितेत समतेचा स्वीकार केलेला आहे. 'युद्धखोरी' या कवितासंग्रहात 'मुस्लिम महार' या कवितेत भारतीय समाजव्यवस्थेतील दलितपण / महारपणा घालविण्यासाठी मुस्लिम धर्माचा स्वीकार केला पण तरीही येथील समाज व्यवस्थेतील प्रश्न संपलेले नाहीत हे सांगताना ते म्हणतात,

"तुटपुंज्या आयुष्याच्या दो-या वळतांना ।
खस्तत जाणारे माझे मायबाप।
भरभराटीला येतील। तो दिवस कधी उगवणार ।
पिस्तोल, कानून, बदला कारवाई आता
सर्व आसमंतातच पेटलाय संघर्ष."[७]

अशा प्रकारे भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता, संघर्ष इब्राहीम खान यांनी चित्रित केली आहे.

**एहतेशाम देशमुख यांच्या कवितेतील सांस्कृतिक संघर्ष :-**

एहतेशाम देशमुख यांची कविता ही सामाजिक परिवर्तनाची कविता आहे. त्यांचा 'अजान' हा कवितासंग्रह प्रकाशित असून त्यातून मुस्लिम धर्मामधील अनिष्ट चालीरिती, परंपरा, कर्मकांड यांच्या विरोधात आवाज उठविला आहे. मुस्लिम धर्मात तलाखपीडित स्त्रीयांचे दुःख कसे भयानक आहे याचे चित्रण त्यांनी केले आहे. मुस्लिम धर्मात असणा-या बुरखा सारखी अनिष्ट प्रथा, कुटुंबनियोजनाला असणारा विरोध, मुल्ला - मौलवीचे

अन्याय हे सांस्कृतिक विषय एहतेशाम देशमुख यांच्या कवितेत आलेले आहेत.

**जावेद कुरेशी यांच्या कवितेतील सांस्कृतिक संघर्ष :-**

जावेद कुरेशी यांची कविता ही अत्यंत खळबळजनक, जळजळीत आणि विद्रोहाचे रणशिंग फुंकणारी आहे. त्यांचा 'बएत' हा कवितासंग्रह प्रकाशित असून त्यातून मुस्लिम धर्माच्या व्यथा वेदनांचे चित्रण केले आहे. हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील वाद हा जमातवादाला कसे खतपाणी घालतो याचे चित्रण आले आहे. बाबरी मशिद हिंदूत्ववाद्यांनी नष्ट केल्यानं तर त्यांची लेखणी एक वेदना घेऊन उभी राहते हे सांगताना ते म्हणतात की,

"बाबरीचा गुमद कोसळताना ठसठसा रडलो होतो,
पण मशिदीवर नाही, तर या देशाच्या भवितव्यावर"[८]

हा जातीयवाद भारतात कसे उग्ररूप धारण करत आहे आणि मुस्लिमांवर कसे अन्याय अत्याचार केले जात आहेत याचे चित्रण कुरेशी यांच्या कवितेतून आलेले आहे.

वरील मुस्लिम कवी शिवाय इतर अनेक कविंनी आपल्या कवितेतून सांस्कृतिक संघर्षाची मांडणी केली आहे. त्यात खलील मोमीन यांचा 'अक्षराई', ए. के. शेख यांचे 'ओंजळ', 'जुलूस माझा', 'गुलदस्ता', 'मोरपीस' कवी मुबारक शेख यांचे काव्याचे ऋण, पाचरव, 'सत्यमेव जयते', कवी मुबारक शेख, कवी खावर, इलाही जमादार अशा अनेक कविंनी आपल्या कवितेतून सांस्कृतिक संघर्ष मांडला आहे.

**निष्कर्ष :-**

१. माणसाला तुच्छ समजणा-या समाजव्यवस्थेविरुद्ध मुस्लिम कवितेतून आवाज उठवला आहे.
२. मुस्लिम कवितेतून धार्मिक आणि जातीय दंगलीचे चित्रण केलेले आहे.
३. हिंदुत्त्ववादी संघटनांच्या निर्मितीनंतर मुस्लिम साहित्यिकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा बदलला याचे चित्रण मुस्लिम कवितेत आलेले आहे.
४. मुस्लिम कवितेतून मुस्लिम समाजातील स्त्रियांच्या दुःखाचे चित्रण आलेले आहे.
५. मुस्लिम समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा, चालीरिती यांच्याविरुद्ध कवितेतून आवाज उठविला.

**संदर्भग्रंथ सूची :-**

१. शहाजिंदे फ.म. - 'मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखकसूची, भूमी प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती २००४, पृ.क्र.१३२
२. तत्रैव - पृ.क्र. १३७
३. तत्रैव - पृ.क्र. १३७
४. तत्रैव - पृ.क्र. १३७
५. तत्रैव - पृ.क्र. १३५
६. तत्रैव - पृ.क्र. १३९
७. तत्रैव - पृ.क्र. १३९
८. तत्रैव - पृ.क्र. १४१
९. ढेरे, रा.चिं. - मुसलमान मराठी संतकवी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १० एप्रिल १९६७
१०. शहाजिंदे फ.म. - 'मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरुप, भूमी प्रकाशन, लातूर प्रथम आवृत्ती १४ जून २०१४